कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
25 Sep 2026 - Page 4

# शालेय वयातच सायबर साक्षरतेचा धडा

## अकॅडमिक हाइट्सच्या विद्यार्थ्यांना 'सायबर शक्ती क्लब'तर्फे डिजिटल सुरक्षेचे मार्गदर्शन



कराड/प्रतिनिधी : इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत असताना ऑनलाइन सुरक्षिततेची जाणीव शालेय वयातच निर्माण होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने अकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूल, कराड येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर जागरूकता उपक्रम घेण्यात आला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडच्या 'सायबर शक्ती क्लब'च्या माध्यमातून झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

'माझी माहिती, माझी जबाबदारी' हा संदेश केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणुकीचे विविध प्रकार आणि त्यापासून बचावाचे उपाय समजावून सांगण्यात आले. फिशिंग संदेश, संशयास्पद लिंक, बनावट ऑफर, अनोळखी व्यक्तींकडून येणारे संदेश, सोशल मीडिया खात्यांची सुरक्षितता तसेच वैयक्तिक माहितीची चोरी याबाबत विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे माहिती देण्यात आली.

सायबर वॉरियर्स अनिकेत ढोत्रे आणि विशाखा गुजर यांनी, विद्यार्थ्यांशी संवाद साधत मजबूत व स्वतंत्र पासवर्डचा वापर, सोशल मीडिया गोपनीयता सेटिंग्ज, टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन आणि सार्वजनिक वाय-फाय वापरताना घ्यावयाची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. कोणतीही संशयास्पद लिंक उघडण्यापूर्वी तिची खातरजमा करणे, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद साधताना सावध राहणे आणि वैयक्तिक तपशील सहजपणे शेअर न करणे, यावर विशेष भर देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केल्याने उपक्रमाला संवादात्मक स्वरूप प्राप्त झाले. सोशल मीडिया, ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल खात्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित विद्यार्थ्यांच्या शंकांचे यावेळी निरसन करण्यात आले.

अकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलचे संचालक संजय जाधव आणि प्राचार्य सजाद मीर यांनी उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. शालेय वयातच सुरक्षित इंटरनेट वापराच्या सवयी विकसित झाल्यास विद्यार्थ्यांना डिजिटल जगात अधिक जबाबदारीने वावरता येईल, असे त्यांनी नमूद केले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांचे या उपक्रमास मार्गदर्शन लाभले. 'सायबर शक्ती क्लब'च्या शिक्षक समन्वयक प्रा.डॉ. प्रियांका शिंदे यांनी उपक्रमाचे समन्वयन केले.